वर्ष : ०४ | अंक: २४ | मुंबई, मंगळवार ८ मे २०१८ ते १४ मे २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION
NO. THW/205/2016-2018

संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादकः- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पोलिसांचे अपुरे संख्याबळ

3 → ई-कचऱ्याचे जीवघेणे डोंगर

रातोरात श्रीमंत होण्याच्या नादात तुरुंगात ← 4

## अलर्ट...! १५ राज्यांना वादळाचा धोका




देशभरातील १३ राज्यांना सोमवारी खराब हवामानाचा फटका बसण्याची शक्यता आहे. हवामान खात्याने वादळासहित जोरदार पाऊस आणि गारा पडण्याची शक्यता वर्तवली आहे. गृहमंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, जम्मू काश्मीर आणि हिमाचल प्रदेशात काही ठिकाणांवर वादळासहित गारांचा पाऊस होण्याची शक्यता आहे, तर उत्तराखंड आणि पंजाबमधील काही ठिकाणी जोरदार वारे वाहत पाऊस पडण्याची शक्यता आहे. गेल्या आठवड्यात पाच राज्यांमध्ये वाळूच्या वादळाने थैमान घातलं होतं. यासोबतच पडलेल्या तुफान पावसामुळे जवळपास १२९ जणांचा मृत्यू झाला, तर अनेकजण जखमी झाले.

गृहमंत्रालय आणि हवामान खात्याने जारी केलेल्या अलर्टनंतर हरियाणाचे शिक्षणमंत्री राम बिलास शर्मा यांनी राज्यातील सर्व शाळा सोमवारी आणि मंगळवारी बंद राहणार असल्याचं जाहीर केलं आहे. अनेक ठिकाणी लोकांचा झालेले मृत्यू आणि संपत्तीचं नुकसान पाहता पंचकुला प्रशासनाने लोकांना वादळ आणि पावसापासून आपली सुरक्षा करण्यासाठी योग्य ती पाऊलं उचलण्याचं आवाहन केलं आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांच्या सुरक्षेसाठी योग्य ती उपाययोजना करण्यास सांगण्यात आलं आहे.

## भूसंपादनाचा ज्वालामुखी





**अहमदाबाद- मुंबई बुलेट ट्रेन हा पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीतील एक ज्वलंत मुद्दा असणार आहे, हे या प्रकल्पावर अन्य पक्षांकडून सातत्याने होणाऱ्या टीकेवरून स्पष्ट दिसत आहे. वर्षभरात या प्रकल्पाकरिता पूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न राहील. या प्रकल्पाकरिता जमीनसंपादन करण्यावरून, पुनर्वसनाच्या पॅकेजवरून शिवसेनेपासून डाव्या पक्षांपर्यंत सारेच सरकारला घेरण्याचा प्रयत्न करणार, याची चुणूक पालघर जिल्ह्यातील पालघर, डहाणू, वसई व तलासरी या चार तालुक्यांमधील ८० गावांतील जमीन अधिग्रहणासंबंधी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत प्रकल्पबाधितांनी केलेल्या घोषणाबाजी, गोंधळातून प्राप्त झाली.**

### छुप्या पद्धतीने पोलीस बंदोबस्तात सर्वेक्षण सुरू

### पुनर्वसनाच्या पॅकेजवरून शिवसेनेपासून डाव्या पक्षांपर्यंत सारेच सरकारला घेरण्याचा प्रयत्न करणार

बैठकीकरिता ग्रामस्थ जमले असताना प्रत्यक्षात जेथून ही ट्रेन जाणार आहे, तेथे छुप्या पद्धतीने पोलीस बंदोबस्तात सर्वेक्षण सुरू असल्याची वार्ता ग्रामस्थांच्या कानांवर येताच त्यांनी बैठक उधळून लावली. ठाणे जिल्ह्यातील दिव्याजवळील आगासन, म्हातार्डे परिसरांतही अशाच पद्धतीने पूर्वसूचना न देता सर्वेक्षण सुरू केल्याने जनतेत रोष निर्माण झाला होता. हा संताप 'आगासन गावबचाव संघर्ष समिती'च्या रूपाने संघटित झाला आहे. हा प्रकल्प उभारणाऱ्या नॅशनल हायस्पीड रेल्वे कॉर्पोरेशन लि. कंपनीने अशा प्रकारे लपूनछपून सर्वेक्षण करण्याची गरज नाही. बुलेट ट्रेन प्रकल्पाला लोकांचा व राजकीय पक्षांचा विरोध असताना, कंपनीने सर्व निणऱ्यांमध्ये व कृतींमध्ये पारदर्शकता राखणे गरजेचे आहे. ठाणे, पालघर या भागांतील शेतकरी मुख्यत्वे भातशेती करतात. मत्स्योद्योग येथील गोरगरिबांना आधार देतो. गेल्या काही वर्षांत या परिसरात बांधकाम क्षेत्राला सुगीचे दिवस आले आहेत. त्यामुळे येथील जमिनीचे भाव वाढले आहेत. त्यातच, समृद्धी महामार्गाकरिता जमीन देणाऱ्यांना जमिनीच्या दराच्या पाचपट पैसे कसे झटपट मिळाले आणि रातोरात त्यांचे भाग्य कसे उजळले, याच्या कहाण्या लोकांच्या कानांवर येत असल्याने जेवढे अधिक ताणून धरू, तेवढे जास्त पदरात पडेल, अशी जमीनमालकांची अपेक्षा आहे. अगोदर समृद्धी महामार्गालाही झालेला विरोध भरपाईच्या आमिषाने केला गेला. त्यामुळे समृद्धीच्या पॅकेजपेक्षा अधिक मोठे पॅकेज, नोकरी, विकसित जमीन, बुलेट ट्रेनचा पास अशा मागण्या लोक करत आहेत. बुलेट ट्रेनच्या उभारणीवर व्यर्थ खर्च करण्यापेक्षा सध्याच्या उपनगरी रेल्वेसेवेचा विकास करावा, अशी मागणी सर्वसामान्य प्रवासी करत आहेत. बुलेट ट्रेन सुरू करायची, तर ती मुंबई-दिल्ली का नाही? अहमदाबाद-मुंबई का? असे प्रश्न शिवसेना, मनसेने यापूर्वी केले आहेत.

## नालेसफाईच्या नावाने 'शिमगा'च, केवळ २५ टक्के कामे पूर्ण

**मुंबई - मे महिना सुरू झाला, तरीदेखील मुंबई महापालिकेने नालेसफाईच्या कामी अद्याप वेग पकडलेला नाही. परिणामी, लोकप्रतिनिधींकडून मुंबई महापालिकेवर टीका केली जात आहे. पावसाळ्यापूर्वी आवश्यक नालेसफाई करण्यात आली नाही, तर पावसाळ्यात मुंबापुरीची पुन्हा तुंबापुरी होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे विश्वसनीय सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, अद्याप केवळ २५ टक्के नालेसफाईची कामे पूर्ण झाली आहेत. त्यामुळे उर्वरित कामे कधी मार्गी लागणार हा प्रश्न अनुत्तरितच आहे.**

प्रशासकीय माहितीनुसार, कंत्राट पद्धतीच्या नालेसफाईच्या कामांसाठी १५४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या वर्षी मोठ्या नाल्यांतून ४ लाख ९४ हजार ७३९ टन गाळ काढण्यात येणार आहे. यापैकी ३ लाख ४६ हजार ३१८ टन गाळ पावसाळ्यापूर्वी काढण्यात येणार आहे. उर्वरित ३० टक्के गाळ पावसाळ्यानंतर काढण्यात येणार आहे. छोट्या नाल्यांतून पावसाळ्यापूर्वी २ लाख २३ हजार ५७० टन गाळ काढण्यात येणार आहे. उर्वरित ३० टक्के गाळ पावसाळ्यानंतर काढण्यात येईल. नालेसफाईची कामे वेगाने होत नसल्याच्या कारणास्तव यापूर्वीच महापालिका प्रशासनावर टीकास्त्र उगारण्यात आले होते. राजकीय पक्षांसह स्वयंसेवा संस्था आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही प्रशासनाकडून होत असलेली नालेसफाई समाधानकारक होत नसल्याचे म्हटले होते.

पावसाळ्यात पाणी साचून तलावसदृश्य स्थिती निर्माण होते. त्यामुळे वाहतूक कोलमडण्यासह विविध समस्यांना सामोरे जावे लागते. साचलेल्या पाण्याचा निचराही होत नाही. ठिकठिकाणी बसविण्यात आलेले उपसा पंप कुचकामी ठरल्याने, मुंबापुरीची 'तुंबापुरी' होते. भायखळा, चिंचपोकळी, वरळी, दादर हिंदमाता, माटुंगा गांधी मार्केटसह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील सखल भाग, मुंबई आणि ठाणे शहराला जोडणाऱ्या लाल बहादूर शास्त्री मार्गावरील कुर्ला डेपो, कमानी सिग्नल या व्यतिरिक्त विद्याविहार बस स्थानक परिसर, पश्चिम उपनगरात मिलन सब वे, अंधेरी पूर्वेकडील मरोळ परिसरासह पश्चिम उपनगरातील सखल भागांत पावसाळ्यात पाणी साचते.




## कुळयेवाडी विकास मंडळ अयोजित आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्त द्वारे मोफत आरोग्य शिबिर व शस्त्रक्रिया तसेच चष्मा वाटप करण्यात आले




**दिनांक २९ रविवार रोजी रत्नागिरी जिल्ह्यात गुहागर तालुक्यातील कुळये वाडी येथे अतिशय दुर्गम भागात जेथे आज ही मोबाईल सेवा पोहोचू शकली नाही अशा ठिकाणी आश्रय ट्रस्ट व कुळयेवाडी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण गुहागर तालुक्यातील रहिवासियांसाठी मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये दोन हजार लोकांनी भाग घेतला होता. यामध्ये चोवीस रुग्णांवर मोफत मोतीबिंदै शस्त्रक्रिया करण्यात आली. त्याचप्रमाणे लहान व वयोवृद्ध अशा पाचशेच्या वर माणसांना मोफत चष्मा वाटप करण्यात आले. कुळयेवाडीतील सर्व ग्रामस्थांनी व आजूबाजूच्या गावातील लोकांना ने-आण करण्यासाठी वाहनांची सोय केली होती.**

उर्वरित पृष्ठ 4 वर

सौजन्य व्हॉट्सअप



## संपादकीय...

# ई-कचऱ्याचे जीवघेणे डोंगर


संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक

जगाच्या लोकसंख्येपेक्षा जगात आज मोबाइलची संख्या अधिक आहे, असे सांगितले तर आश्चर्य वाटेल; पण हे खरे आहे. अधिक लोकसंख्या असलेल्या भारत, चीन यांसारख्या देशांत मोबाइल आणि स्मार्टफोनने क्रांती घडविली आहे. मोबाइल वापरणाऱ्यांची केवळ संख्याच वाढत आहे असे नाही, तर मोबाइल तयार करणाऱ्या आणि विकणाऱ्या मंडळींनी या देशांत नवनवीन विक्रम प्रस्थापित केले आहेत. इंडियन सेल्युलर असोसिएशनच्या (आयसीए) म्हणण्यानुसार, चीनच्या खालोखाल मोबाइल हँडसेट बनविणारा भारत हा आता जगातील दुसरा देश ठरला आहे. आतापर्यंत मोबाइलचे उत्पादन करणाऱ्या देशांत चीनखालोखाल दुसरा क्रमांक व्हिएतनामचा होता. परंतु, भारतीय कंपन्यांनी आता व्हिएतनामला मागे टाकले आहे. पुढील वर्षापर्यंत भारतातील मोबाइल फोनचे वार्षिक उत्पादन पन्नास कोटी नग इतके होईल, असे सांगितले जात आहे. मोबाइल क्रांतीचा हा एक महत्त्वपूर्ण पैलू आहे. परंतु, याची जी दुसरी बाजू आहे, ती अत्यंत चिंताजनक आहे. सव्वाशे कोटी लोकसंख्येच्या या देशात दरवर्षी पन्नास कोटी मोबाइल हँडसेट बनत असतील आणि खपत असतील, तर जुने मोबाइल फेकून देण्याचे प्रमाण किती मोठे असेल, हे वेगळे सांगायला नको. सव्वाशे कोटी लोकसंख्येतील प्रत्येक जण मोबाइल वापरत नाही. ठराविक वर्गाकडेच ही सुविधा असून, जुना मोबाइल फेकून दुसरा घेणाऱ्यांची संख्या वाढते आहे. मोबाइलमध्ये वेगवेगळी फीचर्स सातत्याने येत असतात आणि पूर्वीची फीचर्स जुनी झाल्यामुळे जुना हँडसेट बदलण्याची फॅशनच हल्ली येथे रुजली आहे. त्यामुळे कचऱ्यात पडलेल्या मोबाइलची संख्या वाढत जाऊन ई-कचऱ्याची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. जगभरातील चीन आणि भारत हे दोनच देश असे आहेत, जेथे एक अब्ज लोक मोबाइलशी जोडले आहेत. देशात जेव्हा प्रथमच मोबाइल फोन आले, तेव्हा पहिले दहा लाख ग्राहक मिळविण्यासाठी मोबाइल कंपन्यांना सुमारे पाच वर्षे लागली होती. परंतु, आता भारत आणि चीन या दोन देशांमुळेच मोबाइल फोनची जगभरातील संख्या जगाच्या लोकसंख्येच्या म्हणजेच सात अब्ज या संख्येच्या पुढे गेली आहे. ही आकडेवारी इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियनकडून (आयटीयू) प्राप्त झालेली आहे. एकीकडे ही आकडेवारी असे सांगते की, गरीब मानल्या गेलेल्या देशांमधील लोकही अत्यावश्यक बनलेल्या संचार सुविधांचा लाभ घेण्यास सक्षम होत आहेत. परंतु, दुसरीकडे ही आकडेवारी एक अत्यंत भयावह भविष्य दाखवीत आहे. इलेक्ट्रॉनिक क्रांती जगाला एका अशा धोक्याकडे घेऊन चालली आहे, ज्याकडे अद्याप लक्षच दिले गेले नाही. हा धोका आहे, इलेक्ट्रॉनिक कचऱ्याचा. आयटीयूच्या म्हणण्यानुसार, भारत, रशिया, ब्राझीलसह सुमारे दहा देश असे आहेत, जिथे स्थानिक लोकसंख्येपेक्षाही मोबाइल फोनची संख्या अधिक आहे. रशियात पंचवीस कोटींपेक्षा अधिक मोबाइल फोन असून, ही संख्या रशियाच्या लोकसंख्येच्या दीडपट आहे. ब्राझीलमध्ये २४ कोटी मोबाइल फोन आहेत. ब्राझीलच्या लोकसंख्येपेक्षा ते १.२ पट अधिक आहेत. त्याचप्रमाणे अमेरिका आणि रशियाला मागे टाकणाऱ्या भारतात आज अशी परिस्थिती आहे की, येथील निम्म्याहून अधिक लोकसंख्येच्या हातात मोबाइल फोन आहेत. संपूर्ण जग आज विकास या एकाच शब्दाच्या मागे धावत सुटले आहे. संगणक आणि मोबाइल फोनसारख्या उपकरणांनी आपले जीवन बरेच सुविधाजनक बनविले आहे. फॅक्स मशिन, झेरॉक्स मशिन, डिजिटल कॅमेरे, लॅपटॉप, इलेक्ट्रॉनिक खेळणी आणि गॅजेट्स, एअर कंडिशनर, मायक्रोवेव्ह ओव्हन, इलेक्ट्रॉनिक थर्मामीटर अशा वस्तूंनी आपले आयुष्य घेरले गेले आहे. ही यादी आणखीही बरीच मोठी आहे. परंतु, या सर्व वस्तूंचा सुखसोयी म्हणून वापर करताना त्यापासून निर्माण होऊ घातलेल्या धोक्याबद्दल संभ्रम कायम आहे. ही उपकरणे जेव्हा जुनी होतील आणि वापरातून बाद होतील, तेव्हा ई-कचऱ्याची समस्या अक्राळविक्राळ रूप धारण करेल, यात बिलकूल शंका नाही. ही समस्या भारत, चीन यांसारख्या तिसऱ्या जगातील देशांसाठी अधिक गंभीर आहे. कारण, अमेरिका, ब्रिटन यांसारख्या विकसित देशांवर या कचऱ्याचा फारसा परिणाम झाल्याचे दिसत नाही. या वस्तू तिथे तयार होत असल्या, तरी त्यांची बाजारपेठ तिसऱ्या जगातील देशांमध्येच आहे. अर्थातच, आपल्यावरील संकट दुहेरी स्वरूपाचे आहे. आधी आपल्याला आपल्या देशात निर्माण होणाऱ्या ई-कचऱ्याचा प्रश्न सोडवायचा आहे आणि नंतर बाहेरून येणारा ई-कचऱ्याचा मोठा प्रवाह रोखायचा आहे. ई-कचऱ्याच्या विश्वव्यापी संकटाच्या सद्यःस्थितीवर एकवार नजर टाकल्यास आपल्याला समजू शकेल की, अशा वस्तूंच्या व्यापारासाठी मिळत असलेल्या गुंतवणुकीवर आपल्याला का पाणी सोडले पाहिजे आणि संचार क्रांतीसारख्या आधुनिक विकासाच्या संकल्पनांचा फेरविचार आपल्याला का करावा लागणार आहे. ई-कचरा अत्यंत विषारी असून, पर्यावरणासह मानवी आरोग्याचा बळी या कचऱ्यामुळे जाऊ शकतो. केवळ मोबाइल फोनचाच विचार केला तरी, जे जुने फोन कचऱ्यात फेकून दिले जात आहेत. त्यातील प्लास्टिक आणि किरणोत्सर्ग करणारे घटक शेकडो वर्षांपर्यंत विघटित होऊ शकणार नाहीत. ते वर्षानुवर्षे तसेच राहतील आणि त्यातून किरणोत्सर्ग सुरूच राहील. त्याचा एकंदर मानवी आरोग्यावर किती प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, याचा अंदाजही बांधणे शक्य नाही. केवळ एका मोबाइलची छोटीशी बॅटरी सहा लाख लिटर पाणी दूषित करण्यास सक्षम असते. याव्यतिरिक्त केवळ एका संगणकात ३.८ पौंड वजनाचे शिसे, फॉस्फरस, कॅडमियम, पारा यांसारखे घातक पदार्थ असतात. या पदार्थांचे ज्वलन झाल्यास ते थेट वातावरणात शिरतात आणि विषारी प्रभाव उत्पन्न करतात. कॉम्प्युटरच्या स्क्रीनसाठी उपयोगात आणली जाणारी कॅथोड रे पिक्चर ट्युब ज्या प्रमाणात शिसे (लेड) पर्यावरणात सोडते, ते प्रमाण अत्यंत धोकादायक आहे. पर्यावरणाची अभूतपूर्व हानी होत असून, प्रगत देश हा कचरा आपल्याकडे पाठवून सुखी होत आहेत, तर आपण आपल्या पायांवर कुऱ्हाड मारून घेत आहोत. हे वेळीच ओळखले पाहिजे आणि असे घातक उद्योग बंद करून प्रगतीच्या संकल्पनाही दुरुस्त केल्या पाहिजेत.

# प्लॅस्टिकविरोधी लढा नि अपघाती संशोधन



**पृथ्वीवर आणखी एका समस्येने अक्राळविक्राळ स्वरूप धारण केले आहे व त्यापासून वाचण्यासाठी जगाची त्रेधातिरपिट होत आहे. ही समस्या म्हणजे मानवनिर्मित प्लॅस्टिकमुळे होणारे प्रदूषण! प्रारंभी या बहुउपयोगी, अल्पमोली प्लॅस्टिकचा वापर लोकप्रिय झाला. जेवढ्या वस्तू प्लॅस्टिकच्या बनविता येतील तेवढ्या वस्तू प्लॅस्टिकच्याच बनविण्यात येऊ लागल्या. त्यात 'वापरा आणि फेका' ही संस्कृती वाढीस लागली; आणि आता पृथ्वीतलावर सर्वत्र प्लॅस्टिक आणि प्लॅस्टिकच झाले आहे.**

१९५०च्या सुमारास जागतिक प्लॅस्टिकची निर्मिती होती २० लाख टन प्रतिवर्ष. आता जगात तब्बल ३८ कोटी टन इतके प्लॅस्टिक प्रत्येक वर्षाला (म्हणजे १९५० च्या दशकाच्या सुमारे दोनशे पट) तयार होत आहे. १९५०पासून सुमारे ६.३ अब्ज टन प्लॅस्टिकची निर्मिती झाली आहे. दुर्दैवाने यातील केवळ नऊ टक्के प्लॅस्टिक प्रक्रिया होऊन पुनर्वापरात येते, बारा टक्के जळले वा जाळले जाते व उर्वरित ७९ टक्के प्लॅस्टिक निसर्गात फेकले जाते. ते सर्व नदीनाल्यांमार्फत शेवटी समुद्रात जाते. शहरातील गटारी, नाल्यांमध्ये ते अडकल्यामुळे शहरात महापूरसदृश्य परिस्थिती निर्माण होते. प्लॅस्टिकच्या वस्तू पोटात गेल्यामुळे गायी वगैरे मृत्युमुखी पडताहेत, तर समुद्रातील प्लॅस्टिकमुळे संपूर्ण सागरी जीवन भीषण संकटात सापडले आहे.

समुद्रातील क्षारयुक्त पाण्यामुळे व सूर्यप्रकाशातील अतिनिल किरणांमुळे प्लॅस्टिकचे छोटे-छोटे तुकडे - मायक्रो प्लॅस्टिक्स निर्माण होतात. हे मायक्रोप्लॅस्टिक्स इतके लहान असतात, की ते सहज माशांच्या पोटात पोचू शकतात व नंतर ते मासे खाणाऱ्या लोकांच्या पोटात जातात. ते घातक असतात. हे प्लॅस्टिक असेच समुद्रात वाहून जात राहिले तर २०५० पर्यंत समुद्रातील सर्व माशांच्या वजनापेक्षा समुद्रातील प्लॅस्टिकचे वजन जास्त भरेल! शास्त्रज्ञांच्या अभ्यासानुसार प्लॅस्टिकमुळे सुमारे ४०० प्राण्यांच्या प्रजातींचे जीवन धोक्यात आले आहे. आता प्लॅस्टिकच्या दुष्परिणामामुळे जग जागृत होत असून, अनेक देश प्लॅस्टिक वापरावर, निर्मितीवर बंदी घालत आहेत; तर काही देश दंडात्मक कारवाई करीत आहेत. ब्रिटनमधील ४२ उद्योगांनी प्लॅस्टिकपासून होणारे प्रदूषण कमी करण्याचे नुकतेच ठरविले आहे. प्लॅस्टिकला सध्या जे पर्याय आहेत, त्यामुळेही पर्यावरणाची हानी होतच असते. एका प्लॅस्टिकच्या पिशवीच्या निर्मितीमुळे होणारे पर्यावरणाचे नुकसान टाळण्यासाठी एक कापडी पिशवी किमान १३१ वेळा वापरली पाहिजे, असे ब्रिटिश सरकारचे प्लॅस्टिकविषयीचे विश्लेषण सांगते. प्लॅस्टिक पिशवीऐवजी कागदी पिशवी वापरली व तिचा पुनर्वापर नाही केला, तर तिच्यामुळे निर्माण होणारा कर्बवायू प्लॅस्टिक बॅगच्या निर्मितीमुळे निर्माण होणाऱ्या कर्बवायूच्या चौपट अधिक असतो. सर्वच प्लॅस्टिक आपल्या जीवनातून हद्दपार करणे सध्यातरी कठीण आहे. दवाखान्यात डॉक्टर, नर्स, प्रयोगशाळांमध्ये शास्त्रज्ञ, विद्यार्थी वापरतात ते हातमोजे, निरोध, फुगे अशा काही वस्तू प्लॅस्टिकच्याच असाव्या लागतील. सध्यातरी दुसरा पर्याय नाही. अनेक अन्नपदार्थ प्लॅस्टिकच्या वेष्टनात असल्यामुळे ते बराच काळ टिकून राहतात व वाया जाऊन पर्यावरणात मिसळण्यापासून म्हणजेच प्रदूषण करण्यापासून रोखले जाते. प्रश्न आहे तो भरमसाठ प्लॅस्टिकचा! आता प्लॅस्टिकविरुद्ध लढ्यास प्रारंभ झाला आहे. बॉयन स्लॅट या २३ वर्षांच्या डच तरुणाने 'ओशिएन क्लीनअप' (समुद्राची स्वच्छता (करा) नावाची कंपनी उभारली आहे. या कंपनीची योजना आहे 'ग्रेट पॅसिफिक गार्बेज पॅच' (जीपीजीपी) जहाजांद्वारा समुद्रात विस्तीर्ण जाळी सोडून तरंगणाऱ्या प्लॅस्टिकच्या वस्तू गोळा करून जमिनीवर आणावयाच्या. त्यासाठी ९२०० चौ. कि.मी. आकाराची अनेक विस्तीर्ण जाळी वापरण्यात येणार आहेत. या योजनेस येत्या जुलैमध्ये प्रारंभ होईल व ती पूर्ण होण्यास २०५० वर्ष उजाडेल. खरी समस्या पुढेच आहे. या जमा केलेल्या प्लॅस्टिकची विल्हेवाट कशी लावायची? त्यावरचा उपाय म्हणजे प्लॅस्टिकचे पुनर्चक्रीकरण (रिसायकलिंग), फेरवापर (रियुज) व नवीन प्लॅस्टिक निर्माण करावयाचे नाही. दुसरा उपाय म्हणजे प्लॅस्टिक खाऊन जगणारे किंवा विघटन करणारे जीवाणू, बुरशी शोधायच्या किंवा जनुक अभियांत्रिकीच्या साहयाने निर्माण करावयाच्या. याविषयी प्रयत्न व संशोधन चालू आहे. नुकत्याच अशा एका प्रयोगात अनपेक्षितरीत्या प्लॅस्टिकचे विघटन करणारा जैविक उत्प्रेरक (बायोकॅटॅलिस्ट) म्हणजेच एन्झाईम किंवा वितंचक प्रयोगशाळेत निर्माण करण्यात शास्त्रज्ञांनी यश मिळविले आहे.

प्रत्येक मिनिटाला जगभरात दहा लाख प्लॅस्टिकच्या बाटल्या विकल्या जातात. त्या बहुधा तशाच निसर्गात फेकून दिल्या जातात. या बाटल्या पॉलीइथिलीन टेरेप्थॅलेट (पीईटी - पेट) नावाच्या रेणूंच्या शृंखलेपासून बनविलेल्या प्लॅस्टिकच्या असतात. हे 'पीईटी' विघटीत होत नाही. कित्येक वर्षे निसर्गात तसेच राहते. नुकतेच ब्रिटनमधील युनिव्हर्सिटी ऑफ पोर्टसमाऊथमधील शास्त्रज्ञ डॉन मॅकगीइन व त्यांच्या सहकाऱ्यांना जीवाणूंमध्ये असे एक वितंचक सापडले आहे, की ते या 'पेट'चे विघटन घडवून आणते. या वितंचकाला त्यांना 'पेटेज' असे नाव दिले आहे.

'इडिओनेल्ला साकायन्सिस' नावाच्या जीवाणू (बॅक्टेरियम) कडून 'पेट'चे विघटन होत असल्याचे जपानमधील शास्त्रज्ञांना २०१६ मध्ये साकाई येथील प्लॅस्टिकच्या बाटल्यांच्या पुनर्चक्रीकरण उद्योगात आढळून आले होते. हे वितंचक 'पीईटी' किंवा 'पेट'चे मोनो (२ - हायड्रॉक्सील) इथाईल टेरेप्थॅलीक ॲसिड (एमएचईटी) या रासायनिक पदार्थात रूपांतर करतो व नंतर दुसरे वितंचक या 'एमएचईटी'चे टेरेप्थेलीक ॲसिड व इथिलीन ग्लायकॉल या दोन रासायनिक पदार्थांमध्ये विघटन करते. 'इडिओनेल्ला साकायन्सिस' हे रासायनिक पदार्थ अन्नाचे स्रोत म्हणून वापरते. वनस्पतींच्या पानावर व इतरत्रही मेणासारख्या पदार्थांचे पातळसे आवरण असते. या पदार्थाला 'क्युटीन' असे म्हणतात. या 'क्युटीन'चे विघटन करणारे जीवाणू आहेत. ते त्यांच्यातील 'क्युटीनेज' नावाच्या वितंचकाच्या साहयाने 'क्युटीन'चे विघटन करतात. 'पेटेज'ची क्रिया संथगतीने होत असते. तिचा वेग वाढला तरच 'पेट'चे विघटन वेगात व लवकर होईल. म्हणून या शास्त्रज्ञांनी 'पेटेज' व 'क्युटीनेज'साठी कारणीभूत असणारी जीवाणूंमधील जनुके शोधली व त्यांचा अभ्यास करून वेगळेपण शोधून काढले. त्यासाठी त्यांनी जीवाणूंच्या हजारो प्रजातींच्या जनुकांचा अभ्यास केला. या अभ्यासावरून त्यांनी 'पेटेज'च्या रचनेत १-२ अमिनोआम्ले घुसडून नवे प्रकार निर्माण केले. असे करता-करता त्यांना आढळून आले, की अपघाताने त्या जनुकांमध्ये अनपेक्षित बदल (म्युटेशन्स) घडून आलेले आहेत. त्यामुळे एक वितंचक नैसर्गिक वितंचकापेक्षा २० टक्क्यांहून अधिक वेगाने 'पीईटी'चे विघटन करीत आहे. मॅकगीहन यांनी यात आणखी सुधारणा म्हणजेच अजून वेग वाढविणारे वितंचक निर्माण करावयाचे ठरविले आहे. त्यासाठी अशा वितंचकासाठीचे जनुके जीवाणूंमध्ये प्रविष्ट करावे लागतील! या वितंचकाच्या रचनेचा त्यांनी प्रथिन स्फटीकशास्त्रानुसार अभ्यास करून आणखी वेगवान वितंचके निर्माण करण्यासाठी संशोधन करीत आहेत. हे संशोधन त्यांनी १७ एप्रिलच्या 'प्रोसिडिंग्ज ऑफ नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्सेस' या शोधपत्रिकेत प्रसिद्ध केले आहे.

प्लॅस्टिकविरोधी लढ्यातील हे प्रयत्न जगातील उपलब्ध प्लॅस्टिकचे प्रमाण व प्लॅस्टिक निर्मितीचा वेग पाहता, नगण्यच आहेत. शिवाय या प्रयत्नांचे यश दिसावयास बराच काळ जावा लागेल. तरीही एका अपघाती संशोधनामुळे प्लॅस्टिकविरोधी लढ्यात एक आशेचा किरण दिसत आहे असे म्हणता येईल.

# कचऱ्यातून पेटणार मुंबईच्या पाली हिलच्या रस्त्यावरील दिवे



मुंबईतील पाली हिल परीसरातील रस्त्यांवर आता कचऱ्यामुळे प्रकाश पडणार आहे. कचरा आणि इतर टाकाऊ गोष्टींमधून ऊर्जा निर्माण करून त्यापासून या परिसरातील पथदिव्यांना ऊर्जा पुरवण्यात येणार आहे. 'शून्य कचरा परिसरा'चे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवत वांद्रे येथील पाली हिल रेसिडन्ट्स असोसिएशन या संघटनेने रविवारी हा प्रकल्प हाती घेतला आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील ६८ पथदिव्यांना ऊर्जा मिळणार आहे. या परिसरात ७८ इमारती आणि २३ बंगले आहेत. त्यापैकी काही बंगले हे ज्येष्ठ अभिनेते ऋषी कपूर, गीतकार गुलजार यांसारख्या प्रसिद्ध लोकांचे आहेत. अशा उच्चभ्रु वस्तीत कचऱ्यापासून पथदिवे पेटणार असल्याने या गोष्टीची जास्त चर्चा आहे.

या प्रकल्पासाठी १०० चौरस फूट इतकीच जागा आवश्यक होती. त्यासाठी जागा शोधणे हे एक मोठे आव्हान होते. मात्र, या प्रकल्पासाठी जमीन मिळवून देण्याच्या प्रक्रियेत पालिका प्रशासन, स्थानिक नेतेमंडळी आणि आमदार, खासदारांनी सहकार्य केले, असे संघटनेच्या सचिवांनी सांगितले. तसेच, या प्रकल्पाची यंत्रणा ही वाराणसी येथील प्रकल्पासारखीच आहे. या प्रकल्पासाठी एप्रिल २०१६पासून काम सुरू होते आणि फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक अपेक्षित होती. त्यामुळे कंपन्यांकडून कॉर्पोरेट सोशल रिस्पॉसिबीलिटी संकल्पनेअंतर्गत आर्थिक मदत घ्यावी लागली, अशी माहितीही त्यांनी दिली. या प्रकल्पासाठी रहिवाशांकडून ओला आणि सुका कचरा वेगळा केला जात होता. या प्रकल्पाची चाचणी करण्यात आली आहे आणि ही चाचणी यशस्वीदेखील ठरली, असेही त्यांनी सांगितले. तर आपल्या अधिकारक्षेत्रात असलेला हा पहिला परिसर कचरामुक्त झाल्याचे वॉर्ड अधिकाऱ्याने सांगितले.

# लाखभर गटारांपैकी केवळ १४५० ठिकाणीच झाकणे



गेल्या वर्षी उघड्या गटारातून वाहून गेल्याने डॉ. दीपक अमरापूरकर यांचा मृत्यू झाल्यावर सर्व गटारांवर संरक्षक जाळ्या बसवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, पहिल्या टप्प्यात लाखभर गटारांपैकी केवळ १४५० गटारांवरच झाकणे बसविण्यात येणार आहे.

गटारांवर जाळ्या बनविण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. मात्र शहरातील लाखाहून अधिक गटारांपैकी केवळ १४५० झाकणांखाली या जाळ्या बसवण्यात येणार आहेत. आतापर्यंत ९०० हून अधिक ठिकाणी या जाळ्या बसवण्यात आल्या आहेत. त्यावर दीड कोटी रुपये खर्च करण्यात आले असून महत्त्वाचे म्हणजे या सर्व जाळ्या शहराच्या दक्षिण भागात बसवण्यात आल्या आहेत. पूर्व आणि पश्चिम उपनगरांमध्ये नाल्यांवाटे पाणी वाहून नेले जाते तर दक्षिण भागातील पाणी वाहण्यासाठी भूमिगत गटारे आहेत. त्यामुळे पावसाळ्यात रहिवासी गटारांवरील झाकणे काढून टाकतात. गेल्यावर्षी घडलेला दुर्दैवी प्रकार पुन्हा घडू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून या जाळ्या बसवण्यात येत असून यावर्षी सखल व पाणी भरण्याची शक्यता असलेल्या दक्षिण शहरातील काही भागांना प्राधान्य देण्यात आले आहे. पूर्व व पश्चिम उपनगरातूनही सखल भागातील झाकणांची माहिती मागवण्यात आली आहे, मात्र पावसाळ्याआधी तिथे जाळ्या बसवल्या जाणार नाहीत. त्यामुळे उपनगरातील रहिवाशांना त्यांच्या जबाबदारीवर पुरातून चालत जावे लागणार आहे.

# दिव्यात चोरीच्या पाण्याची सर्रास विक्री



**ठाणे :** ठाणे महापालिका हद्दीचा महत्त्वाचा भाग असलेल्या दिवा-दातिवली परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही उन्हाळ्यात पाणीटंचाईने रौद्र रूप धारण केले असून पाण्याच्या शोधात या गावातील नागरिक दाही दिशा हिंडत असताना अनेक ठिकाणी पाणी व्रिकीचा काळा बाजार सुरू झाल्याचे चित्र दिसू लागले आहे. दिवा गावातील काही राजकीय नेत्यांचा आश्रय लाभलेली काही तरुण मंडळी या व्यवसायात उतरली असून मुंब्रा-दिवालगत असलेल्या चाळींमध्ये चक्क ५०० रुपये प्रति कॅन याप्रमाणे पाणी विकले जात आहे. आगासन निळजे गावामधून टाकण्यात आलेल्या जल वाहिनीतून पाणी चोरायचे आणि या चाळींमध्ये आणून विकायचे, असे प्रकार वाढीस लागले असून बेकायदा बांधकामांचे आगार असलेल्या या भागात सुरू असलेल्या पाणी विक्रीकडे महापालिका प्रशासनाचा कानाडोळा होत असल्याचे चित्र आहे.

वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिलेल्या दिवा परिसराच्या विकासासाठी ठाणे महापालिकेने गेल्या काही वर्षांपासून आर्थिक तरतूद करण्यास सुरुवात केली आहे. यंदाच्या अर्थसंकल्पातही या भागातील पायाभूत सुविधांसाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करण्यात आली असून या माध्यमातून या ठिकाणी रस्ते, पूल, मलवाहिन्या, जलवाहिन्या टाकण्याची कामे हाती घेण्यात येणार आहेत. एकीकडे दिव्यातील चित्र पालटण्यासाठी प्रयत्न केले जात असताना दुसरीकडे मात्र येथील भीषण पाणीटंचाई आणि त्या माध्यमातून होणाऱ्या पाणी चोरी, विक्रीकडे मात्र प्रशासनाने कानाडोळा केला आहे.

# पनवेलला पाणी देणार नाही

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याबद्दल दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर उच्च न्यायालयाने संबंधित सरकारी यंत्रणा आणि शेजारील पालिकेला भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत. यावर नवी मुंबई पालिका आयुक्त डॉ. रामास्वामी एन. यांनी मोरबे धरण हे नवी मुंबई पालिकेच्या मालकीचे असल्याचे स्पष्ट केले. हे पाणी अन्य कुणालाही देणार नसल्याचे उच्च न्यायालयासमोर सांगण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नवी मुंबई पालिकेशेजारील पनवेल महापालिका क्षेत्रात पाण्याच्या टंचाईमुळे नागरिकांचे चांगलेच हाल होत आहेत. आवश्यक तेवढा पाणीपुरवठा मिळत नसल्याने पनवेल पालिकेतील सत्ताधारी आणि प्रशासन यांच्याविरोधात नागरिकांत संताप व्यक्त केला जात आहे. याचाच परिणाम म्हणून पनवेलमधील विष्णू बाबाजी गवळी यांनी उच्च न्यायालयात पनवेल महापालिका क्षेत्रात नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा होत नसून तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे अशी याचिका दाखल केली आहे. यात नवी मुंबईसह विविध पाच सरकारी विभागांना पक्षकार बनवले आहे. शुक्रवारी उच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत अभय ओक यांच्या खंडपीठाने नवी मुंबई पालिकासह ६ सरकारी विभागांना बाजू मांडण्याचे आदेश दिले. पनवेल महापालिकेत नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. नुकताच मे महिना सुरू झाला असताना एप्रिल महिन्यापासून पावसासाठी अनेक दिवस बाकी असताना टँकरद्वारे शहरात अनेक ठिकाणी पाणीपुरवठा करावा लागत आहे. गेल्या २५ वर्षांत तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी ठोस नियोजन न केल्यामुळेच दरवर्षी पनवेलला पाणीटंचाईच्या झळा सहन कराव्या लागत आहेत.

या वर्षी सत्ताधारी व तत्कालीन आयुक्त डॉ. सुधाकर शिंदे आणि प्रशासन यांच्या वादामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे. एप्रिल महिन्यापासून ही पाणीटंचाई जाणवत असून मे आणि जूनमधील बेभरवशाचा पाऊस यामुळे नागरिकांना पाण्यासाठी नेहमीच वणवण करावी लागणार आहे.

शहराला दररोज कमीतकमी १९ एमएलडी पाण्याची गरज असताना तेवढे पाणी देता येत नाही. त्यामुळेच शहरात योग्य पाणीपुरवठा होत नसल्याचे याचिकेत म्हटले होते.

# केडीएमटीचे खासगीकरण

गेल्या अनेक वर्षांपासून रडतखडत सुरू असलेली कल्याण-डोंबिवली परिवहन उपक्रमाची (केडीएमटी) बससेवा आता अखेर खासगीकरणाच्या वाटेने जाणार आहे. पहिल्या टप्प्यात केडीएमटी उपक्रमाच्या ताफ्यातील ९० बसगाड्या कंत्राटी पद्धतीने चालवण्यास देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. अपुऱ्या मनुष्यबळामुळे आगारात उभ्या राहणाऱ्या बस रस्त्यावर चालवता याव्यात, यासाठी खासगी पद्धतीने वाहक, चालक नेमण्याचा निर्णयही प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे नजीकच्या काळात केडीएमटीची बससेवा अधिक सक्षम होण्याची चिन्हे दिसत आहेत.

कल्याण डोंबिवली महापालिका हद्दीची लोकसंख्या एव्हाना १२ लाखांच्या पलीकडे पोहचली असून २७ गावे तसेच कल्याण, टिटवाळा परिसराचा झपाट्याने होणारा विस्तार लक्षात घेता ही संख्या आणखी वाढेल, असे चित्र आहे. सद्य:स्थितीत या दोन्ही शहरातील अंतर्गत वाहतुकीचा डोलारा रिक्षा सेवेवर अवलंबून असतो. मात्र, रिक्षाचालकांकडून मनमानी भाडेआकारणी होत असल्याने प्रवाशांना ही सेवा महागात पडते. महापालिकेची स्वत:ची परिवहन सेवा आहे. मात्र, सुरुवातीपासूनच ती प्रवाशांना योग्य सेवा पुरवण्यात अपयशी ठरली आहे. परिवहन उपक्रमाच्या सक्षमीकरणाची गरज वेळोवेळी बोलून दाखविण्यात आली होती.

# संप करावा तर असा! जपानच्या संपकरी बस चालकांनी ठेवला जगासमोर आदर्श




इंटरनॅशनल डेस्क - संप कसा करावा यासाठी जपानच्या संपकरी बस चालकांनी साऱ्या जगासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे. भारतात संप म्हटलं की आज काय-काय बंद राहणार असा विचार आपल्या डोक्यात येतो. डॉक्टर संपावर जातात तेव्हा रुग्णांचा मृत्यू झाल्याचे वृत्तही पाहिलेच असेल. ऑटोरिक्षा चालकांचा संप असो, टॅक्सीचालकांचा तर कधी बस चालकांचा संप. विविध मागण्यांसाठी संप करण्याचा अधिकार सर्वांनाच असला तरीही सामान्य नागरिकांचे मात्र दैनंदिन आयुष्य विस्कळीत होते. जपानचे बस चालकही संपावर गेले पण, त्यांच्या या आंदोलनामुळे कुणीही आपल्या ऑफिसला उशीरा पोहोचलेला नाही. कुठेही वाहतुकीची किंवा सामान्य आयुष्याची कोंडी झाली नाही. तसेच या संपकरी बस चालकांनी आपला संदेश सुद्धा तेवढ्याच प्रभावीपणे दिला.

## प्रवाश्यांना दिली मोफत सेवा

- जपानच्या ओकायामा शहरात गेल्या अनेक वर्षांपासून रायोबी नावाची खासगी बस सेवा सुरू आहे. पण, काही दिवसांपूर्वीच दुसऱ्या एका कंपनीने त्यांच्या तुलनेत स्वस्तात बस सेवा सुरू केली. ही नवीन बस सेवा रायोबीच्या रुटलाच सुरू करण्यात आल्या आहेत.
- अशात रायोबीच्या बस चालकांना आपली नोकरी जाणार अशी भिती निर्माण झाली. कित्येक वर्षे काम करूनही या कंपनीने त्यांना नोकरीची हमी दिली नाही. दुसऱ्या कंपनीशी स्पर्धा करताना आपली कंपनी बंद पडेल किंवा आपल्याला कामावरून काढले जाईल या भितीने बस चालक संघटित झाले. त्यांनी संप पुकारण्याचा निर्णय घेतला.
- मात्र, या संपात त्यांनी बस चालवणे बंद केले किंवा थांबवले नाही. उलट ज्या रुटवर त्यांच्या सेवा सुरू होत्या, त्याच रुटवर दररोजप्रमाणे वेळेवर पोहोचले आणि प्रवासी भरले. फरक एवढाच की प्रवाशांकडून तिकिटांचे पैसेच घेतले नाही. सर्वच प्रवाश्यांना त्यांनी मोफत बस सेवा दिली.
- त्यामुळे, शहरभर चालणाऱ्या या लोकल बससेवेचा लाभ घेणाऱ्यांपैकी कुणालाही त्याचा फटका बसला नाही. सगळेच वेळेवर आपल्या कार्यालयात आणि संध्याकाळी वेळेवरच घरी पोहोचले. कुणालाही मिनिटभर सुद्धा उशीर झाला नाही.

## देशाची गती थांबता कामा नये...

जपान जगभरात आपल्या तंत्रज्ञान आणि वेळेला महत्व देणारा देश म्हणून ओळखला जातो. संपात बस सेवा स्थगित केल्यास आपल्या शहरातील लोक वेळेवर कामासाठी पोहोचू शकणार नाहीत. परिणामी साऱ्या जगात वेळ पाळणाऱ्या जपानची प्रतिमा मलीन होईल याची जाणीव त्या बस चालकांना होती. त्यामुळेच, त्यांनी अशा प्रकारच्या आंदोलनाचा निर्णय घेतला, ज्याचे जगभरात कौतुक होत आहे. त्यांचा रोष कंपनीवर होता. त्यामुळे, नुकसान सुद्धा नागरिकांचे नव्हे, तर फक्त कंपनीचे झाले आहे.

# भारतातील अद्यापही १९ कोटी लोक वीजेपासून वंचित, वर्ल्ड बँकेचा रिपोर्ट

वर्ल्ड बँकेने मोदी सरकारसाठी दिलासा देणारी एक बातमी आणली असून त्यांच्या रिपोर्टनुसार, भारतातील ८५ टक्के लोकसंख्येपर्यंत वीज पोहोचली असून मोदी सरकार उत्कृष्ट काम करत असल्याची कौतुकाची थाप त्यांनी दिली आहे. देशातील प्रत्येक गावात वीज पोहोचवल्याचा दावा केल्यामुळे मोदी सरकारला ट्रोल व्हावं लागलं होतं. मात्र वर्ल्ड बँकेच्या या रिपोर्टमुळे मोदी सरकारला थोडा दिलासा नक्कीच मिळाला असेल.

बातमी दिलासा देणारी असली तरी मोदी सरकारसमोरील आव्हान मात्र संपलेलं नाही. वर्ल्ड बँकेचे मुख्य एनर्जी इकॉनॉमिस्ट विव्हिअन फोस्टर यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतातील १२५ कोटी लोकसंख्येपैकी १५ टक्के लोकांपर्यंत अद्यापही वीज पोहोचलेली नाही. पण जर भारताने याच वेगाने काम केलं तर वेळेआधी म्हणजे २०३० मध्येच भारत आपलं लक्ष्य पूर्ण करेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील प्रत्येक गावात वीज पोहोचल्याची घोषणा केल्याचा एका आठवड्यातच वर्ल्ड बँकेचा हा रिपोर्ट आला आहे. या रिपोर्टनुसार देशातील ८५ टक्के लोकांपर्यंत वीज पोहोचली आहे.

वर्ल्ड बँकेने जारी केलेल्या रिपोर्टनुसार २०१० ते २०१६ दरम्यान दरवर्षी भारतातील तीन कोटी लोकांपर्यंत वीज पोहोचत आहे. हा आकडा कोणत्याही देशापेक्षा जास्त आहे. 'विद्युतीकरणात भारत अत्यंत चांगलं काम करत आहे. भारतातील ८५ टक्के लोकांपर्यंत वीज पोहोचल्याची



माहिती आम्ही देत आहोत', असं फोस्टर यांनी सांगितलं आहे. भारतीय सरकारने जारी केलेल्या आकडेवारीपेक्षा वर्ल्ड बँकेने दिलेले आकडेवारी जास्त असल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केलं आहे.आकडेवारी चांगली असली तरी विद्युतीकरणाच्या बाबतीत भारताचा वेग बांग्लादेस आणि केनियापेक्षा कमी आहे. फॉस्टर यांनी सांगितल्यानुसार, 'भारत आता विद्युतीकरणाच्या शेवटच्या टप्प्यात प्रवेश करत आहे. या टप्प्यात देशातील दुर्गम भागात वीज पोहोचवण्याचं आव्हान असणार आहे. जर भारताने आधीच ८५ टक्के लोकसंख्येपर्यंत वीज पोहोचवली आहे तर त्यांना आता अवघड टप्प्यांतून पार पडावं लागणार आहे. वंचित लोक जितके दूर आणि दुर्ग भागात असतील तितकं त्यांच्यापर्यंत पोहोचणं कठीण जाणार आहे'.

भारतात वीज हा अद्यापही चिंतेचा विषय आहे. फॉस्टर यांनी सांगितल्यानुसार, आम्हाला कल्पना आहे की भारतातील काही भागांमध्ये अद्यापही तासनतास विजेची समस्या आहे. त्यांच्यापर्यंत वीज पोहोचवणे सर्वात महत्वाची गोष्ट आहे. भारताने याकडे लक्ष देत मेहनत करणं अपेक्षित आहे.

# अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार करुन जिवंत जाळले

गेल्या काही दिवसांपासून बलात्काराच्या घटनांनी देश हादरलेला असतानाच अशीच एक घटना समोर आली आहे. या घटनेतील नराधमांचे क्रौर्य ऐकून आपल्या जिवाचा थरकाप उडाल्याशिवाय राहणार नाही. झारखंड येथील चतरा या जिल्ह्यात एका अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. पीडित मुलीसोबत काय झाले आहे हे समजताच गावातील पंचांनी या घटनेतील दोषींना प्रत्येकी ५० हजारांचा दंड ठोठावला. दंड ठोठावल्याचा राग मनात धरून हे नराधम पीडित मुलीच्या घरी गेले. तिथे तिच्या घरात बळजबरीने घुसले आणि तिला जाळून ठार केले.




पीडित मुलगी ८ वीत शिकत होती अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. छतरा या ठिकाणच्या राजा केंदुआ गावात ही घटना घडली. मात्र या सगळ्या घटनेनंतर जो दंड ठोठावण्यात आला त्याचा राग मनात ठेवून या नराधमांनी या मुलीच्या घरात घुसून तिला जिवंत जाळले. तसेच तिच्या आई वडिलांनाही मारहाण केली. पीडित मुलगी आपल्या चुलत बहिणीच्या लग्नासाठी गेली होती. तिथून परतत असताना तिच्यावर चार जणांनी बलात्कार केला. त्यानंतर रात्री ११ च्या सुमारास ही मुलगी रडत घरी आली आणि तिने आपल्या आई वडिलांना सगळा प्रकार सांगितला. पीडित मुलीच्या आई वडिलांनी पंचायतीत दाद मागितली. शुक्रवारी पंचांनी पंचायत बोलावली आणि सगळ्या नराधमांना प्रत्येकी ५० हजारांचा दंड ठोठावला. हाच राग मनात धरून या नराधमांनी पीडित मुलीला जिवंत जाळले. पोलिसांना या प्रकरणाची माहिती मिळताच ते घटनास्थळी पोहचले. पीडित मुलीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. तर नराधमांना अटक करण्यात आली आहे.

(पृष्ठ १ वरुन)

# कुळयेवाडी विकास मंडळ अयोजित आश्रय सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक ट्रस्त द्वारे मोफत आरोग्य शिबिर व शस्त्रक्रिया तसेच चष्मा वाटप करण्यात आले










**त्याचप्रमाणे भोजन व्यवस्थाही करण्यात आली होती. या शिबिरामध्ये १० रुग्णांवर लवकरच बायपास अँजीयोप्लास्टी शस्त्रक्रिया करण्यात येईल असे आश्रय ट्रस्टचे संस्थापक व पोलीस बातमी पत्रचे संपादक दिपक मोरेश्वर नाईक यांनी सांगितले. या शिबिरामध्ये सेवन हिल्स हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर तसेच सुराणा हॉस्पिटलचे डॉक्टर व परिचारीक व स्थानिक गुहागर येथील सिव्हील हॉस्पीटलचे डॉक्टर अशा एकूण विस डॉक्टरांनी सहभाग घेतला होता. या वेळी सिव्हील हॉस्पिटलच्या वतीने रुग्णांची रक्त चाचणी घेण्यात आली.**

**या शिबिराचे उद्घाटन श्री. श्रिकांत भास्कर जाधव तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख श्री. माटेकर यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरामध्ये सर्व क्षेत्रातल्या अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती लावली होती.**



# रातोरात श्रीमंत होण्याच्या नादात तुरुंगात

**नवी मुंबई :** अमली पदार्थ (एमडी) विक्रीप्रकरणी नेरूळ पोलिसांनी नुकतीच ज्या दोन आरोपींवर कारवाई केली त्यांनी घरच्या गरिबीला कंटाळून हे कृत्य केल्याचे तपासात समोर आले आहे. अमली पदार्थ वितरण आणि विक्री करण्यासाठी अल्पशिक्षित आणि हलाखीच्या स्थितीत असलेल्यांना हाताशी धरून रातोरात श्रीमंत होण्याचे आमिष दाखवले जात असल्याचे तपासात वारंवार समोर येत आहे.

अमली पदार्थात सर्वात लोकप्रिय झालेल्या म्याऊ म्याऊ म्हणून कुप्रसिद्ध असलेल्या एमडीची (मेथाक्वॉलोन) विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना नेरूळ पोलिसांनी बुधवारी ताब्यात घेतले होते. त्यातील एक आरोपी अल्पवयीन असल्याने त्याची रवानगी पोलिसांनी सुधारगृहात केली, तर दुसरा आरोपी नदीम शरीफ बदायू याला न्यायालयाने ५ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. खबऱ्याने दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी नेरूळ स्टेशननजीक सापळा रचून त्यांच्यावर कारवाई केली.

आरोपींकडून २३ लाख १० हजार रुपयांचे ७६८ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले. यातील नदीम हा उत्तर प्रदेश भूसोली जिल्ह्यातील कव्वाटोला या खेडेगावचा असून दोन्ही आरोपींनी हा गुन्हा पहिल्यांदाच केल्याचे तपासात समोर आले आहे. दोघांच्याही घरची परिस्थिती हलाखीची आहे. त्यात हाताला काम नाही. त्यामुळे त्यांना एका मित्राच्या ओळखीने हे काम मिळाले. यासाठी साधारण एक लाख रुपये देऊ, असे आमिष त्यांना दाखवण्यात आले होते. गेल्या महिन्यात दोघेही नवी मुंबईत याच कामासाठी आले असता एमडीचा व्यवहार नक्की केला होता. एवढे पैसे मिळतील या आशेने रातोरात श्रीमंत होण्याचे स्वप्न पाहत त्यांनी कामाला होकार दिला, मात्र पहिल्याच प्रयत्नात त्यांच्या हाती बेड्या पडल्या.

# पालकांनी मतदान केल्यास विद्यार्थ्यांना गुणदान!

स्पर्धेच्या युगात प्रत्येक गुणाला महत्त्व आहे. अशा वेळी पालकांनी मतदान केल्यास आपल्या गुणांमध्ये चार गुणांची भर पडणार असेल, तर आपल्या पालकांच्या मतदान हक्काबाबत विद्यार्थीच अधिक आग्रही राहणार हे उघडच आहे. कर्नाटकमधील खासगी शाळांनी जे पालक कर्नाटक विधानसभा निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावतील त्यांच्या पाल्यांना सहामाही परीक्षेत चार अधिक गुण (आई-वडिलांच्या मताचे प्रत्येकी दोन) दिले जाणार असल्याचे जाहीर केले आहे. या अभिनव उपक्रमामुळे पाल्यच एक प्रकारे आपल्या कुटुंबातील मतदानाबाबत जागरूक असणार असून त्यामुळे मतदानाच्या आकडेवारीवर सकारात्मक परिणाम होण्याची चिन्हे आहेत.

मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू असतात. कर्नाटक प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांच्या खासगी संघटनेकडून (केएएमएस) हा गुणदानचा उपक्रम राबविला जाणार आहे. त्यानुसार मतदान केल्यानंतर पालकांना पुरावा म्हणून शाळेत जाऊन हाताची शाई दाखवायची आहे. त्यानंतर तेथे असलेल्या डब्यात चिठ्ठी टाकून त्यात पाल्याचे नाव व इयत्ता लिहिल्यास हे गुण दिले जातील, असे संघटनेचे सरचिटणीस डी. शशिकुमार यांनी स्पष्ट केले. मतदानादिवशीच पालकांनी शाळेत येऊन हा पुरावा दाखवावा असे नाही, तर हाताची शाई असेपर्यंत त्यांच्या सोयीने यावे, अशी सवलत त्याबाबत देण्यात आली आहे. पूर्वप्राथमिक ते दहावीपर्यंत हा उपक्रम राबवण्यात आला आहे. विशेष म्हणजे त्यासाठी विद्यार्थ्यांचे आधी प्रबोधन करण्यात आले. मतदानाचे महत्त्व त्यांना पटवून देण्यात आले. त्याद्वारे हे विद्यार्थी महत्त्वाची भूमिका बजावून पालकांना मतदानासाठी प्रवृत्त करतील, असा विश्वास शशिकुमार यांनी व्यक्त केला. कर्नाटक विधानसभेसाठी १२ मे रोजी मतदान आहे. त्या दिवशी शनिवार आहे. त्यामुळे मतदान न करता जोडून सुट्टीला जाऊ नये अशी आमची अपेक्षा आहे.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)